''मराठी रंगभूमीचा भाग्यशाली भूतकाळ लक्षात घेतला म्हणजे वर्तमान काळातील तिची दैन्यावस्था बघूनही तिच्या तेजस्वी भविष्याबद्दल मन निराश होण्याचे यत्किंचितही कारण उरत नाही. रंगभूमीला पुन्हा नवचैतन्य प्राप्त व्हावे यासाठी समाजोत्सव साजरे करण्याच्या कामी नाटकांचा सर्रास उपयोग झाला पाहिजे. विद्यालयीन अभ्यासक्रमात नाट्यशास्त्राचा अभ्यास सुरू केला पाहिजे, सार्वजनिक नाटकगृहे बांधली पाहिजेत.''

**(प्र. के. अत्रे, ३२ वे संमेलन, मुंबई)**

समाधानाचा, श्रमसाफल्याचा आनंद उपभोगत असतो. भरतमुनींनी आपल्या नाट्य शास्त्रात नटाच्या अभिनयाविष्काराच्या व्यापाराचं 'सोडस्मीति मनसा स्मरन्' असं अत्यंत सार्थ, सुसंगत आणि मार्मिक वर्णन केलंय. अभिनयाच्या अध्यात्मात अध्यासाचा ध्यास हेच सूत्र प्रमाणभूत आहे. नट आपल्या भूमिकेचा कोष विणतो त्यावेळेस तो कोळ्यासारखा त्यात अडकतो आणि कोषापासून अलिप्तही राहतो. कारण आपण विणकर आहोत, कोष नव्हे याचं सतत भान त्याला ठेवावं लागतं.

'काव्यप्रकाश' ह्या ग्रंथामध्ये काव्यप्रयोजनाचा (पूर्वी नाटकालाही काव्यच म्हटल जायच) एक श्लोक आहे...

**'काव्यं यशसे, अर्थ कृते व्यवहार**
**विदे शिवेतर क्षतये।**
**सद्य: परनिर्वृतये, कान्तासंमीत**
**तयोपदेश युजे॥'**

म्हणजेच नाटकापासून यश, पैसा, व्यवहार जाणण्यासाठी, अकल्याण दूर करण्याकरिता, ताबडतोब मोक्षाचा आनंद देणारा आणि आवडत्या बायकोने केलेल्या उपदेशासारखा आनंद मिळाला पाहिजे. 'काव्यविलास' मध्ये ही असाच एक श्लोक आहे. त्यात म्हटलं आहे की प्रतिमा, निपुणता, लोकव्यवहाराची जाण विद्वानांच्या मार्गदर्शनाचा लाभ आणि नाट्य निर्मितीचीच प्रयोजन नाटकाने दिली आहेत. कालिदासाने 'मालविकाग्नीमित्र' या नाटकाच्या पहिल्याच अंकात नाटकाबद्दल आणि नाट्यकलेबद्दल एक सुरेख श्लोक लिहिलाय. त्याचा अर्थ मी मराठी श्लोकात विषद केलाय.

**देवांचा नेत्रोत्सव यज्ञ - नाट्य मुनी म्हणती।**
**उमेच्या देहात मिसळूनी शंकर जो विभागिती॥**
**सत्त्व, रज, तमाचे सरस लोक चरित जेथे असे।**
**नाट्य - यज्ञ सकळांच्या भिन्न रुचीला भावतसे॥**

मुख्यत: आजच्या रंगभूमीच्या परिस्थितीचा साधक-बाधक विचार हा नाटककारांनी केला पाहिजे. अनुभवात, विचारात, समस्येच्या सोडवणुकीत, जीवन व्यतीत करण्यासाठी काही मार्गदर्शनपर लाभ झाला? आपण स्वत:, कुटुंब आणि समाज यांच्या परस्परसंबंधांबाबत काही दृष्टी आपल्याला लाभली का, अशा तऱ्हेचा विचार प्रेक्षकांनी नाटक पाहून घरी जाताना केला तर ते रंगभूमीच्या समृद्धीसाठी उपकारक ठरेल.

नाट्य संमेलने ही पुढील शंभर वर्षात रंगभूमीला तारक ठरू शकतील का, या संदर्भात विचार करताना लक्षात येईल की नाट्यसंमेलन हा एक स्नेहसोहळा आहे, एकमेकांनी एकमेकाला भेटणं आणि आपापल्या कार्याविषयी आपापले विचार प्रगट करणं, त्यावर चर्चा करणं, निरनिराळ्या विचारांची माणसं एकत्र येणं, या निमित्ताने नट - निर्माता यांच्यात आचार विचार प्रदान होण्यासाठी नाट्यसंमेलनं ही व्हायलाच हवीत. आज त्याच्या उत्सवी स्वरुपाबद्दल चर्चा होते, पण चार लोक यायला हवे असतील तर असंच त्याचं स्वरुप हवं. फक्त त्याला पिकनिकचं स्वरुप येऊ नये, असं मला वाटतं. पण त्याचवेळी अगदीच गंभीर, तांत्रिक प्रश्नांचा उहापोह करण्याचं व्यासपीठ असं देखील त्याचं स्वरुप नसावं. नाटकासंबंधात जागरूक लोकांचं व्यासपीठ असं